लोकमत

## महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाची राज्यस्तरीय कुस्ती: अनिकेत पाटील कुमार केसरी

# आशिष वावरे कामगार केसरी

ोकमत न्यूज नेटवर्क



महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत कामगार केसरीचा मानकरी ठरलेला सद्‌गुरु श्रीश्री सहकारी साखर कारखाना राजेवाडी, आटपाडीचा आशिष वावरे याला सन्मानित करताना पालकमंत्री विजयकुमार देशमुख. त्यावेळी अ‍ॅड. शरद बनसोडे, धनश्याम कुळमेथे, नंदलाल राठोड, मनोज बागले, संजय कोळी, राजकुमार केकडे, राजू पाटील, महेश थोबडे, किसन मेकाले, समाधान भोसले, सी.बी.जाधव, धनराज भुजबळ आदी.

ोलापूर: भवानी पेठेतील जय भवानी शालेच्या क्रीडांगणावर झालेल्या हाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या ज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत कुंभी ासारी सहकारी साखर कारखाना ोल्हापूरचा अनिकेत पाटील कुमार सरी तर सद्‌गुरु श्रीश्री सहकारी ाखर कारखाना राजेवाडी, ाटपाडीचा आशिष वावरे कामगार सरीचा मानकरी ठरला.

कुमार गटासाठी झालेल्या अंतिम ढतीत कुंभी कासारी कोल्हापूरचा ल्ल अनिकेत पाटील याने कुंभी ासारीचाच रोहित पाटील याच्यावर जय मिळविला. त्याला १५ हजार पयांचे बक्षीस, गदा व चषक देऊन न्मानित करण्यात आले.



कुंभी कासारी सहकारी साखर कारखाना कोल्हापूरचा अनिकेत पाटील कुमार केसरीचा मानकरी ठरला.



रोहित पाटील, उपविजेता

❝कामगार हा कष्टकरी वर्ग आहे. कुस्तीच्या माध्यमातून स्वत:चे शरीर सुदृढ करण्याबरोबरच मानसिक सुदृढता मिळविता येते. अशा कष्टकरी वर्गाकरिता मंडळ दरवर्षी कुस्ती स्पर्धा राबवत असताना देण्यात येणारे बक्षीस आणि मानधनाच्या रकमेत वाढ करण्यात यावी.

-विजयकुमार देशमुख, पालकमंत्र

कामगार केसरी स्पर्धेसाठी ालेल्या अंतिम लढतीत सद्‌गुरु ीश्री सहकारी साखर कारखाना जेवाडीचा मल्ल आशिष वावरे याने ानेहिरा सहकारी साखर कारखाना, डेगावचा मल्ल रणजित पवारवर ाजी मारली. त्याला २१ हजार पयांचे बक्षीस, गदा, पट्टा व चषक ऊन सन्मानित करण्यात आले.

या स्पर्धेचे बक्षीस वितरण ालकमंत्री विजयकुमार देशमुख, अ‍ॅड. शरद बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुंबईचे सहायक कल्याण आयुक्त धनश्याम कुळमेथे, नंदलाल राठोड, जनसंपर्क अधिकारी मनोज बागले, सभागृह नेते संजय कोळी, राजकुमार केकडे, राजू पाटील, महेश थोबडे, किसन मेकाले, पश्चिम महाराष्ट्र विभाग महिला अध्यक्षा राजस नागणे-पाटील, प्र.सहायक कल्याण आयुक्त पुण्याचे समाधान भोसले, कामगार कल्याण अधिकारी सी.बी.जाधव आदी उपस्थित होते.

खुल्या पाच वजनीगटात कुस्त्या झाल्या. या कुस्ती स्पर्धेस पंच म्हणून धनराज भुजबळ, अ कोंडकर यांनी काम पाहिले. निवे म्हणून राजाभाऊ देवकते यांनी क पाहिले.

## कामगार कल्याण मंडळाच्या कुस्ती स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे....

- **कुमार केसरी गट:** अनिकेत पाटील (कुंभी कासारी), रोहित पाटील (कुंभी कासारी), गणेश नाईक (भोगावती), सर्वोदय देवाप्पे (श्रीदत्त).
- **खुला गट: पहिला -५७ किलो:** संकेत नंदिवाले (कोपार्डे), जीवन खरात (सद्‌गुरु साखर कारखाना), अमित विरकर (सद्‌गुरु सहकारी कारखाना), छत्रपती सुरवसे (भैरवनाथ कारखाना).
- **गट दुसरा : ६१ किलो:** राजकुमार उन्हाळे (भीमा), वैभव लोंढे (कागल), अभिजित पवार (शिवाई), गणेश खांडेकर (सद्‌गुरु कारखाना).
- **गट तिसरा ६५ किलो:** वृषाल जाधव (भीमा), हनमंत शिंदे (विठ्ठल)
- **कामगार केसरी:** आशिष वावरे (सद्‌गुरु), रणजित पवार (कडेगाव), संगम काकडे (विठ्ठल कॉर्पोरेशन), तुषार झंजे (सद्‌गुरु).

अवधूत माने (विठ्ठल कारखाना), प्रसाद पुकळे (सद्‌गुरु साखर कारखाना

- **गट चौथा ७० किलो:** हृदयनाथ पाचकवडे (कुंभी), राकेश भोकरे (जवाहर), प्रकाश पाटील (कुंभी कासारी), प्रज्ज्वल कांबळे (वारणा).
- **गट पाचवा : ७४ किलो:** दीपक गोपले (सद्‌गुरु), परशुराम नंदिवाले (कुंभी कासारी), समाधान सोरटे (भैरवनाथ), भूषण पाटील (कल्याण शहाड)

दैनिक
# दिव्य मराठी
महाराष्ट्राचे एकमेव निःपक्ष आणि स्वतंत्र वृत्तपत्र
एकूण पाने : १२+४+८=२४ | किंमत ₹ ४.०० | वर्ष ७ | अंक १२७ | महानगर
सोलापूर मंगळवार, २६ फेब्रुवारी २०१९

# आटपाडीचा वावरे कामगार केसरीचा मानकरी

## कोल्हापूरचा अनिकेत पाटील कुमार केसरी

**क्रीडा प्रतिनिधी** | सोलापूर

कोल्हापूरच्या कुंभी कासारी सहकारी साखर कारखान्याचा अनिकेत पाटील राज्यस्तरीय कुमार केसरीचा तर आटपाडीच्या श्री सहकारी साखर कारखाना राजेवाडीचा आशिष वावरे कामगार केसरीचा मानकरी ठरला.

ही स्पर्धा विविध वजनीगटातून झाली. भवानी पेठेतील जयभवानी प्रशालेच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेची पारितोषिके पालकमंत्री विजयकुमार देशमुख, खासदार शरद बसनोडे, मुंबईचे सहायक कल्याण आयुक्त घनश्याम कुळमेथे, नंदलाल राठोड व मनोज बागले यांच्या हस्ते देण्यात आली. धनराज भुजबळ व अनिल कोंडकर यांनी पंच म्हणून काम पाहिले. राजाभाऊ देवकते यांनी या स्पर्धेचे सूत्रसंचालन केले.



कामगार व कुमार केसरीच्या मानकऱ्यांसमवेत प्रमुख पाहुणे पालकमंत्री विजयकुमार देशमुख.

**अंतिम निकाल (प्रथम चार)** : कुमार केसरी : अनिकेत पाटील, रोहित पाटील (कुंभीकासारी), गणेश नाईक (भोगावती), सर्वोदय देवाचे (श्रीदत्त). कामगार केसरी : आशिष वावरे, रणजित पवार (कडेगाव), संग्राम काकडे (विठ्ठल), तुषार झंजे (सद्गुरू).

५७ किलो : संकेत नंदीवाले (कोपार्डे), जीवन खरात, अमित विरकर(सद्गगुरू), छत्रपती सुरवसे (भैरवनाथ). ६१ : राजकुमार उन्हाळे (भीमा), वैभव लोंढे (कागल), अभिजित पवार(शिवाई), गणेश खांडेकर (सद्गुरू). ६५ : वृशाल जाधव (भीमा), हणुमंत शिंदे, अवधूत माने (विठ्ठल), प्रसाद पुकळे (सद्गुरू). ७० : हृदयनाथ पाचकवडे (कुंभी), राकेश भोकरे (जवाहर), प्रकाश पाटील (कुंभी कासारी), प्रज्वल कांबळे (वारणा). ७४ : दीपक गोपणे (सद्गुरू), परशुराम नंदीवाले (कुंभी कासारी), समाधान सोरटे (भैरवनाथ), भूषण पाटील (शहाड).

सकाळ

सोलापूर, मंगळवार २६ फेब्रुवारी २०१९

# कामगार केसरी आशिष वावरे, अनिकेत पाटील कुमार केसरी

## » राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा



सोलापूर : कामगार केसरी विजेता कोल्हापूरचा आशिष वावरे याला २१ हजार रुपये व गदा भेट देताना पालकमंत्री विजयकुमार देशमुख व खासदार ॲड. शरद बनसोडे. याप्रसंगी आयुक्त घनश्याम कुळमेथे, नंदलाल राठोड, मनोज बागले, संजय कोळी, सी. बी. जाधव आदी.

**सोलापूर, ता. २५ :** येथील घोंगडेवस्ती भवानीपेठ येथील जयभवानी प्रशालेच्या क्रीडांगणावर झालेल्या महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या राज्यस्तरीय कामगार व कुमार केसरी कुस्ती स्पर्धेत कुमार गटातून कुंभी कासारी सहकारी साखर कारखाना, कोल्हापूरचा अनिकेत पाटील कुमार केसरी व सद्‍गुरू श्रीश्री सहकारी साखर कारखाना राजेवाडी, आटपाडीचा आशिष वावरे कामगार केसरीचा मानकरी ठरला आहे.

कुमार गटासाठी अंतिम लढतीत कुंभी कासारी कोल्हापूरच्या अनिकेत पाटीलने कुंभी कासारीच्याच रोहित पाटीलवर विजय मिळविला. १५ हजार रुपये, गदा, पट्टा व चषक, कामगार केसरीसाठीच्या अंतिम लढतीत सद्‍गुरू श्रीश्री सहकारी साखर कारखाना राजेवाडी आटपाडीच्या आशिष वावरेने सोन हिरा सहकारी साखर कारखाना, कडेगावच्या रणजित पवारवर विजय मिळविला. २१ हजार रुपये, गदा, पट्टा व चषक प्रमुख पाहुणे पालकमंत्री विजयकुमार देशमुख व खासदार ॲड. शरद बनसोडे यांच्या हस्ते देण्यात आले. या वेळी मुंबईचे सहायक कल्याण आयुक्त घनश्याम कुळमेथे, नंदलाल राठोड व मुंबईचे जनसंपर्क अधिकारी मनोज बागले, महापालिका सभागृह नेते संजय कोळी, नगरसेवक राजकुमार केकडे, नगरसेवक राजू पाटील, माजी नगरसेवक महेश थोबडे, किसन मेकाले, पश्चिम महाराष्ट्र विभाग महिला अध्यक्षा राजस नागणे-पाटील, पुण्याचे प्र. सहायक कल्याण आयुक्त समाधान भोसले, कामगार कल्याण अधिकारी सी. बी. जाधव आदी उपस्थित होते. खुल्या पाच वजनी गटांत कुस्ती स्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्यांना रोख बक्षिसे, प्रमाणपत्र पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आले. पंच म्हणून प्रा. धनराज भुजबळ, प्रा. अनिल कोंडकर यांनी काम पाहिले. निवेदक म्हणून राजाभाऊ देवकते यांनी काम पाहिले.